# मेट्रो-३ चा पहिला मेट्रो रेक फेब्रुवारीत येणार

**प्रतिनिधी/ मुंबई**

'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' प्रकल्पाच्या कारशेडचा प्रश्न अधांतरी असला तरी 'मेट्रो ३'च्या बांधकामासह अन्य कामे मात्र वेगात सुरू आहेत. आता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) मेट्रो गाड्या मुंबईत आणण्याची तयारीही सुरू केली आहे. फेब्रुवारी अखेरीस 'मेट्रो ३' मार्गाचा पहिली रेक आंध्र प्रदेशवरून मुंबईत दाखल होणार आहे.

एमएमआरसीमार्फत ३३.५ किमी लांबीच्या भुयारी 'मेट्रो-३' मार्गाचे काम वेगात सुरू आहे. या प्रकल्पाचे एकूण ७१ टक्के काम पूर्ण झाले आहे. भुयारीकरण ९८ टक्के तर रूळ टाकण्याचे काम १८ टक्के पूर्ण झाले आहे. ४२ ब्रेक थ्रू



(भुयारीकरण पूर्ण करून टीबीएम मशीन बाहेर काढण्यात आल्या) पैकी ४० ब्रेक थ्रू तर मेट्रो स्थानकाचे ७७ टक्के काम पूर्ण झाले आहे. मात्र, फेब्रुवारीत 'मेट्रो-३' प्रकल्पातील पहिली मेट्रो रेक मुंबईत आणण्यात येणार असल्याची माहिती एमएमआरसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, 'मेट्रो-३' साठी आंध्र प्रदेश येथील श्री सिटी येथे आठ डब्यांच्या ३१ गाड्यांची बांधणी करण्यात येत आहे. यातील दोन गाड्यांची बांधणी पूर्ण झाली आहे. या गाड्या मुंबईत आणण्यासाठी योग्य असल्याची चाचणीही पूर्ण झाली आहे. त्यानंतर 'मेट्रो ३' मार्गावर चाचणी सुरू असेही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. यासोबत तिसऱ्या गाडीची बांधणी सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. तर पहिली गाडी लवकरच मुंबईत दाखल होणार असल्याने चाचणीचा मार्ग मोकळा होणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

r.freepressjournal.in